# जाहीर सूचना

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल PIL NO- ४०/२००७ WITH CIVIL APPLICATION NO. ३७/२०१८ मध्ये दि.११.०७.२०२२ रोजीच्या आदेशान्वये धर्मादाय आयुक्त कार्यालयास दि. ०१.०४.२०१० ते दि.३१.०३.२०२१ या कालावधीतील नोंदणीकृत न्यासांकडून वार्षिक ३ टक्के दराने (Gross annual income/of gross annual collection or receipt) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५८ नुसार जमा होणाऱ्या रक्कमेचा तपशील मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सादर करावयाचा आहे. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून माहिती मागविली जात आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ३२, ३३ व ३४ अन्वये नोंदणीकृत न्यासांनी, त्यांच्या वार्षिक हिशेबपत्रकाचे/ हिशेबपत्रकांचे अद्यापपावेतो लेखापरिक्षण करुन घेऊन, संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करुन घेणे आवश्यक आहे. परंतु या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, नोंदणीकृत न्यासांपैकी बहुतांश न्यासांनी अद्यापपर्यंत हिशेबपत्रके दाखल केलेली नाही, ही अत्यंत गंभीर बाब असून, ती महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ६६ व ६७ अन्वये दंडनीय आहे.

तरी याद्वारे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये राज्यातील नोंदणीकृत सर्व सार्वजनिक न्यासांना सूचित करण्यात येते की,

१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ३३ अन्वये त्यांच्या वार्षिक हिशेबपत्रकाचे/हिशेबपत्रकांचे लेखा परिक्षण (Audit) करणे अनिवार्य आहे, अशा सार्वजनिक न्यासांपैकी ज्या न्यासांनी अद्यापपर्यंत मागील प्रलंबित व दिनांक ३१.०३.२०२१ रोजीपर्यंतच्या त्यांच्या अद्ययावत वार्षिक हिशेबपत्रकाचे/हिशेबपत्रकांचे लेखापरिक्षण (Audit) केलेले नाही, त्यांनी ते तात्काळ करुन घ्यावे व संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने दाखल करावीत.

२. ज्या न्यासांनी लेखापरिक्षण केलेले आहेत परंतु सन २०१६ पर्यंत प्रत्यक्षरित्या व सन २०१६ नंतर ऑनलाईन संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल केलेले नाहीत त्यांनी ऑनलाईन पध्दतीने दाखल करावीत. जर त्यांना ऑनलाईन पध्दतीने दाखल करण्यास अडचण येत असेल, तर त्यांनी संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधून दि.२५.०७.२०२२ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने दाखल करावीत.

३. सार्वजनिक न्यासांशी संबंधित सर्व सनदी लेखापाल, विधिज्ञ तसेच अधिकृत लेखापरिक्षक यांनीदेखील संबंधित न्यासांना उपरोक्त नमुद केल्यानुसार अनुषंगिक निर्देश द्यावेत व सदर न्यासांचे अद्ययावत वार्षिक लेखापरिक्षित हिशेबपत्रके कोणत्याही परिस्थितीत दिनांक २५.०७.२०२२ रोजीपर्यंत संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयात ऑनलाईन दाखल करावीत.

उपरोक्त सूचनेनुसार हिशेबपत्रके दाखल न केल्यास, नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, याबाबत नोंद द्यावी.

13.7.22

(महेंद्र के. महाजन)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.